# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS LAT SWITCHGEAR INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २७८ वा शनिवार दि.१३ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी ठोस आराखडा करावा आमदार धिरज देशमुख यांची मागणी;

# लातूरच्या लेकीला जलद गतीने न्याय मिळावा









### मुलांवर लक्ष असणे, ही पालकांची जबाबदारी

आपण अनेकजण मुलींना सांगत असतो... 'असे वाग'. 'तसे वागू नको'. पण, याच गोष्टी घरातील मुलांना फारशा सांगत नाही. पालक म्हणून नेमकी चूक इथेच होते. मुलांवरही तसेच संस्कार पालक म्हणून आपण करायला हवे. त्यांच्यावर लक्ष ठेवायला हवे. त्यांचे मित्र बनून त्यांच्याशी संवाद साधायला हवा, अशा भावनाही आमदार धिरज देशमुख यांनी यावेळी व्यक्त केल्या.

लातूर : उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई यासारख्या मोठ्या शहरात जावून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनींना रहावे लागते. अशा विद्यार्थिनींची सुरक्षा हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. याचा गांभीर्याने व संवेदनशीलतेने विचार करून शासनाने विद्यार्थिनींना योग्य सुरक्षा पुरवावी. त्यासाठी ठोस आराखडा बनवावा, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी शुक्रवारी (ता. १२) येथे केली. शिक्षणासाठी पुण्यात राहत असलेली भाग्यश्री सूर्यकांत सुडे या लातूरच्या विद्यार्थिनीचा पुण्यात खंडणीसाठी निर्घृण खून करण्यात आला. या प्रकरणी न्याय मिळावा यासाठी लातूर येथे काढण्यात आलेल्या न्याय मोर्चात 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज देशमुख हेही सहभागी झाले होते. यावेळी भाग्यश्री सुडे यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. आमदार धिरज देशमुख म्हणाले, आजच्या या मोर्चात सहभागी झालेल्या जनसमुदायातील प्रत्येकाची एकच प्रमुख मागणी आहे की 'आमच्या लेकीला न्याय हवा'. सरकारने लातूरकरांची, पालकांची ही मागणी ऐकून घेवून त्या दृष्टीने पावले टाकावीत. या प्रकरणाचा योग्य तपास करावा. हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे. निष्णात सरकारी वकीलाची नेमणूक करावी. सर्व आरोपींना कठोर शासन करावे. या मागण्या मान्य करून घेवून लातूरच्या लेकीला जलद न्याय मिळवून देण्यासाठी असेच ठामपणे सर्वजण उभे राहू.

## रमजान ईद निमित्त मुस्लीम बांधवासाठी सुधाकर शृंगारे यांनी दिला शांतता आणि मानवतेचा संदेश.





लातूर- प्रेम, शांतता आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या रमजान ईद या पवित्र सणानिमित्त आज दयानंद महाविद्यालय नजिकच्या ईदगाह मैदान येथे उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना सुख, समृद्धी आणि ऐश्वर्य लाभो यासाठी श्री. सुधाकर शृंगारे यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. जिल्ह्यातील सर्व धर्मियांनी एकोप्यानी राहु असा शुभ संदेश दिला. या प्रसंगी भाजप शहर जिल्हाध्यक्ष श्री. देविदासजी काळे, भाजपा शहर युवा मोर्चा अध्यक्ष श्री. गणेश गोमचाळे, श्री. निखिल गायकवाड, श्री. शैलेश भडीकर यासह अनेक पदाधिकारी आणि मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुस-या टप्प्यात ८८ जागा, १,२१० उमेदवार

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीच्या दुस-या टप्प्यात ८८ जागांसाठी २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून एकूण १,२१० उमेदवार आखाड्यात असल्याची माहिती निवडणूक आयोगाकडून देण्यात आली. या टप्प्यात केरळमध्ये सर्वाधिक २० जागांसाठी ५०० उमेदवार आहेत. त्याखालोखाल कर्नाटकमधील १४ जागांसाठी ४९१ उमेदवार रिंगणात आहेत.दुस-या टप्प्यात १२ राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशात मतदान होणार आहे. ८८ जागांसाठी २,६३३ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. यातील १,४२८ अर्ज वैध ठरले होते. आता एकूण १,२१० उमेदवार शिल्लक राहिल्याचे स्पष्ट झाले आहे.ज्या प्रमुख नेत्यांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. त्यात काँग्रेसचे राहुल गांधी, डाव्या आघाडीच्या ॲनी राजा आणि भाजपचे केरळ प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांचा समावेश आहे. हे तिघेही वायनाड मतदारसंघातून उभे आहेत. याशिवाय तिरुवअनंतपूरम मध्ये काँग्रेसचे शशी थरुर, भाजपचे राजीव चंद्रशेखर आणि डाव्या आघाडीचे पी. रवींद्रन अशी तिहेरी लढत होत आहे. राजस्थानमधील कोटा मतदारसंघात मावळत्या लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, जोधपूरमध्ये केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत तर चित्तोडगडमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष सी. पी. जोशी यांचे भवितव्य ठरणार आहे.

## भाग्यश्री सुडे हिचा खून खटला प्रकरणी फास्टट्रॅक कोर्टात चालवा या मागणीसाठी लातुरात निघाला न्याय मोर्चा.






लातूरः- आपल्या लातूर जिल्ह्यातील हरंगूळची मुलगी भाग्यश्री सुडे हिचे अपहरण करून काही नराधमानी तिचा निर्घृण खून करून मृतदेह जाळून पुणे - अहमदनगर राज्य मार्गावरील सुपा परिसरात पुरून देहाची विटंबना करण्यात आली. ही अत्यंत संतापजनक आणि हृदयद्रावक माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना फक्त तिच्या कुटुंबासाठीच नव्हे तर महाराष्ट्रासाठी अतिशय धक्कादायक घटना आहे. या घटनेचा निषेध व्यक्त करून भाग्यश्री सुडे हिचा नराधम मारेकरांना शिक्षा होण्यासाठी आज शुक्रवार १२ एप्रिल रोजी सकाळी लातूर शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून आयोजित केलेल्या या मोर्च्यात श्री. सुधाकर शृंगारे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, भाजप शहर जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष गणेश गोमसाळे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदीप पाटील खंडापूरकर ,भाजपचे अजित पाटील कव्हेकर यांच्यासह विविध जाती धर्मातील नागरिक, महिला, महाविद्यालयीन मुले-मुली मोठ्या संख्येने यात सहभागी झाल्या. यावेळी आमच्या लेकीला न्याय मिळालाच पाहिजे, निष्णात सरकारी वकिलांचे नेमणूक करा, खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा असे हजारो फलक घेऊन महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## समाजसुधारक महात्मा फुले यांना जयंतीनिमित्त आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून विनम्र अभिवादन



लातूर :-ज्येष्ठ विचारवंत, समाज सुधारक, सामाजिक प्रबोधनकार, लेखक अस्पृश्यता व जाती व्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षक देण्याचे कार्य करणारे महात्मा ज्योतिराव फुले तथा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी विनम्र अभिवादन केले.

बाल विवाहाच्या विरोधातील आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक महात्मा फुले यांनी समाज, धर्म आणि परंपरा याचे सत्य समोर आणण्यासाठी अनेक पुस्तकाचे लिखान केले. या थोर विचारवंताच्या जयंती दिनानिमित्ताने भाजपच्या संवाद कार्यालयात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी लातूर तालुका संगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, प्रताप पाटील, अशोक सावंत, पाडूरंग बालवाड, लक्ष्मण नागिमे, लक्ष्मण खलंग्रे यांच्यासह अनेक जण होते.

**संपादकीय....**

# चीन-अमेरिका व्यापारी संघर्ष

चीन आणि अमेरिका यांच्यातील नाते प्रेम आणि द्वेषाचे आहे. भविष्यात चीनला अमेरिकेवर मात करायची आहे आणि त्यासाठी रशियापासून ते उत्तर कोरियापर्यंत सर्व देशांशी घट्ट मैत्री प्रस्थापित करून अमेरिकेला वाकुल्या दाखवण्याचा उद्योग चीनने अनेक वर्षांपासून सुरू ठेवला आहे, तर चीनला ताळ्यावर आणण्यासाठी अमेरिकेने फिलिपाईन्ससारख्या अनेक देशांत लष्करी तळ उभारले आहेत. ऑस्ट्रेलिया, भारताशी संबंध वृद्धिंगत केले आहेत.गेल्या रविवारी चीनच्या दौर्यावर असलेल्या अमेरिकेच्या अर्थमंत्री जेनेट येलेन यांनी चीनचे पंतप्रधान ली कियांग यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी अमेरिका चीनबरोबर परस्पर सहकार्यासाठी उत्सुक असल्याचे स्पष्ट केले. दोन्ही देशांदरम्यानचे संबंध स्थिर आहेत; परंतु ते अधिक दृढ करण्यासाठी पावले उचलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. वास्तविक, अमेरिका आणि चीनचे संबंध अलीकडे तणावाचेच राहिले आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची कॅलिफोर्निया येथे भेट झाली होती, त्यावेळी कोणताही तणाव दिसणार नाही, याची खबरदारी या देशांकडून घेतली गेली. त्यानंतर चीनला भेट देणार्या श्रीमती येलेन या अमेरिकेच्या पहिल्याच मंत्री होत; मात्र याचवेळी चीन आणि अमेरिकेत पुन्हा व्यापारी संघर्ष उद्भवला आहे.चीनची अर्थव्यवस्था मंदीच्या गर्तेत असून, तिला संकटातून सावरण्यासाठी चीन आपला माल मोठ्या प्रमाणात निर्यात करू पाहत आहे. त्यामुळे आपल्या उद्योगांचे काय होणार, अशी चिंता अमेरिका, युरोप आणि मेक्सिकोला वाटते. चीनचा अग्रगण्य वाहन उत्पादक बीवायडीने नुकतीच इलेक्ट्रिक एसयूव्ही केवळ १४ हजार डॉलर इतक्या कमी किमतीस बाजारात आणली. इतक्या स्वस्तातल्या मोटारी बाजारात आल्यास आपल्या कंपन्यांची वाट लागेल, अशी भीती 'अलायन्स फॉर अमेरिकन मॅन्युफॅक्चरिंग' या औद्योगिक संघटनेने व्यक्त केली आहे ती याच कारणाने. चीन मेक्सिकोमार्गे अमेरिकेतल्या बाजारात स्वस्तातल्या मोटारी आणेल, अशी शक्यता अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. केवळ इलेक्ट्रिक वाहनेच नव्हेत, तर सोलर पॅनल्स आणि बॅटर्याही चीन अमेरिका, युरोपमध्ये खपवत आहे.अमेरिकेत चीनमधून येणार्या मोटारींवर २५ टक्के आयात शुल्क आहे; पण मेक्सिको आणि अमेरिकेत मुक्त व्यापार करार आहे. त्यामुळे मेक्सिकोमार्गे चीन मोटारी अमेरिकी बाजारपेठेत आणेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन पुन्हा निवडून आल्यास अमेरिकेच्या वाहन उद्योगाचा बोर्या वाजेल. उलट आपण राष्ट्राध्यक्ष झाल्यास चिनी मोटारींवर सणसणीत कर लावू, अशी गर्जना ट्रम्प यांनी केली आहे. चीनने मोटार उत्पादक कंपन्यांना दशकाहून अधिक काळ वेगवेगळी अनुदाने देऊन सक्षम केले. आता इलेक्ट्रिक वाहनांच्या जागतिक विक्रीत चिनी मोटारींचा वाटा ६० टक्के आहे. देशात दरवर्षी जेवढ्या इलेक्ट्रिक मोटारी खपतात, त्यापेक्षा एक कोटी अधिक वाहने तेथील कंपन्या निर्माण करतात. त्यामुळे या अतिरिक्त मोटारी परदेशी बाजारपेठांत विकण्यासाठी चीन आटोकाट प्रयत्न करत आहे. सोलर पॅनल्स, बॅटरी, पोलाद या वस्तूंसाठीही तो विदेशी बाजारपेठा शोधत आहे. तंत्रज्ञानाच्या नवनवीन क्षेत्रांत उत्पादन क्षमतांचा विस्तार करत आहे. देशांतर्गत बाजारपेठेत मालाचा उठाव झाला नाही, तर चीन निर्यातपेठांमध्ये हा माल खपवण्यासाठी शिकस्त करणार, हे स्पष्ट आहे. या देशाने सोलर सेलच्या किमती जाणूनबुजून कमी ठेवल्यामुळे अमेरिकेतील जॉर्जियातील सुनिव्हा ही सोलर उत्पादक कंपनी स्पर्धेत टिकू शकली नाही. २००८-०९ मधील जागतिक वित्त संकटाच्या वेळी चीनने पोलाद आणि अॅल्युमिनियमचे उत्पादन वाढवले. या दोन्ही वस्तूंची अमेरिकेत प्रचंड प्रमाणात निर्यात करण्यात आली. ट्रम्प राष्ट्राध्यक्ष होताच त्यांनी चीनशी व्यापारयुद्ध छेडले आणि तेथून येणार्या मालावर निर्बंध आणले व जादा करही लावले. मुळात चीनने आधुनिक उत्पादन क्षेत्रात अमर्याद उत्पादन क्षमता रुजवल्या आहेत. त्याचवेळी बायडेन सरकारनेही स्वच्छ ऊर्जा उत्पादने आणि सेमिकंडक्टर उपादनांसाठी अर्थसाह्य देण्याचे ठरवले आहे. त्यासाठी नवीन विधेयकही आणले जात आहे.चिनी मालामुळे अमेरिकेतील उद्योगधंदे बंद पडल्यास स्थानिक पातळीवर बेकारी निर्माण होईल, ही तेथील राज्यकर्त्यांची चिंता स्वाभाविक आहे. मी प्रथम अमेरिकेचे हित जपणार. अन्य देशांनीही तसेच करावे, असे उद्गार राष्ट्राध्यक्ष असताना ट्रम्प यांनी काढले होते.

# आघाडीची आघाडी!

लोकसभेच्या ४८ जागा असलेल्या महाराष्ट्रात मागच्या दोन महिन्यांपासून सुरू असलेले जागावाटपाचे गु-हाळ सत्ताधारी महायुती व विरोधी महाविकास आघाडीत निवडणुकीच्या दुस-या टप्प्याची रणधुमाळी प्रत्यक्षात सुरू झाली तरी कायमच होते. दोन्ही बाजू जागावाटप अंतिम टप्प्यात असल्याचा दावा करत होत्या मात्र, अनेक जागांवर रस्सीखेच, वादावादी, दंड थोपटण्याचे व एकमेकांना इशारे देत शक्तिप्रदर्शन करण्याचे प्रकार सुरू होते. वाचाळवीरांच्या वक्तव्यांनी या वादावादीत तेल ओतण्याचे काम होत असल्याने आघाडीत बिघाडी होणार का? अशीच शंका व्यक्त होत होती. मात्र, गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यातील ४८ जागांच्या वाटपाचे सूत्र एकत्रितरीत्या जाहीर करून विरोधकांच्या ऐक्याची गुढी उभारली. जागावाटपाचा घोळात घोळ महायुतीला अद्याप संपविता आला नसल्याने राज्यातल्या महाविकास आघाडीने याबाबत तरी महायुतीपेक्षा आघाडी घेतल्याचे चित्र आहे. जागावाटपात उद्धव ठाकरे यांचा गट २१, काँग्रेस १७ व शरद पवारांचा गट १० जागा लढविणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. हे जागावाटपाचे सूत्र पाहता भाजपच्या विरोधातील विरोधकांच्या ऐक्यासाठी काँग्रेसने मन मोठे करून त्याग केल्याचे स्पष्ट होते. उद्धव ठाकरे व शरद पवार या दोघांच्याही पक्षात उभी फूट पडली.मात्र, काँग्रेसने आपल्या पक्षात अशी उभी फूट पडू दिली नाही. त्यामुळे जागावाटपात महाविकास आघाडीत काँग्रेसच मोठा भाऊ ठरावा, हीच राज्यातील काँग्रेसजनांची स्वाभाविक इच्छा असणे साहजिकच! मात्र, उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेत राज्यातील विरोधकांच्या आघाडीत आपणच मोठा भाऊ असल्याचे सिद्ध केले. काँग्रेसच्या हायकमांडने विरोधकांच्या ऐक्यासाठी मन मोठे केले नसते तर हे शक्य नव्हतेच. मात्र, त्यागाची ही भूमिका स्थानिक नेते व कार्यकर्त्यांमध्ये झिरपण्यास थोडा काळ लागण्याचीच चिन्हे दिसत आहेत. सांगलीची जागा उद्धव ठाकरे गटाकडेच राहिली तर मुंबईतल्या हव्या त्या चार जागा मिळविण्यात उद्धव ठाकरे यशस्वी ठरले. मुंबईतील दक्षिण मध्य मुंबईची जागा ठाकरे यांच्याकडे गेल्याने काँग्रेसच्या वर्षा गायकवाड नाराज झाल्याचे व त्यांनी थेट दिल्ली दरबारी तक्रार केल्याचे वृत्त आहे. तर सांगलीत विश्वजीत कदम व विशाल पाटील काय भूमिका घेतात याची प्रतीक्षा आहे. जागावाटपानंतर काही ठिकाणी नाराजी दिसत असली तरी आम्ही संबंधित स्थानिक नेत्यांची समजूत काढू असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.तशी समजूत काढली जाईलही पण जागावाटपावरून स्थानिक काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजी असल्याची ही अप्रत्यक्ष कबुलीच आहे. अर्थात तीन पक्षांमध्ये जागावाटप होताना काही जागांवर आग्रही भूमिका घेतली जाणे साहजिकच. मात्र, विरोधकांच्या व्यापक ऐक्यासाठी पक्षनेतृत्वाने मन मोठे करणे गरजेचे असते व तसे ते करून काँग्रेसने राज्यातील महाविकास आघाडीचे ऐक्य टिकवण्यात यश मिळवले, हे मान्यच करावे लागेल. इंडिया आघाडीतील पक्ष इतर राज्यांमध्ये परस्परांच्या विरोधात लढतानाचे चित्र दिसत असताना महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे ऐक्य अबाधित ठेवण्यात यश मिळणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. याचा धसका महायुतीने नक्कीच घेतला असेल कारण महायुतीतील तीन ते चार जागांवरचा तिढा सुटण्याऐवजी वाढतच चालला आहे व त्यावरून तीन पक्षांमधील धुसफूस रोजच बाहेर येते आहे. हे होणे साहजिक व त्यावरही तोडगा काढला जाईलच पण ऐक्याच्या प्रदर्शनात महाविकास आघाडीने आघाडी घेतली व त्यात काँग्रेसने मन मोठे करून मोलाची भूमिका बजावली, त्याबद्दल काँग्रेसचे अभिनंदन करायला हवे. वाद मागे टाकून भाजपविरोधात एकीने लढण्याचा निर्णय महाविकास आघाडीने घेतला हे चांगलेच झाले. मात्र, यासोबतच राज्यात भाजपविरोधात जी सोशल इंजिनीअरिंगची संधी होती ती साधण्यात मात्र महाविकास आघाडी हुकली.वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्यात महाविकास आघाडीला यश आले असते तर विरोधकांच्या भाजपविरोधी ऐक्याला एक वेगळाच भरीवपणा आला असता! प्रकाश आंबेडकर यांचा आजवरचा प्रवास पाहता त्यांनी घेतलेल्या भूमिकेचा महाविकास आघाडीच्या नेत्यांना अगोदरच अंदाज आला असणारच. मात्र, अन्य पक्षांना सोबत घेण्यासाठी जी लवचिकता दाखवायला हवी ती दाखविण्यात महाविकास आघाडीचे नेते यशस्वी ठरले नाहीत. त्यामुळे राज्यात भाजपविरोधातील विरोधकांच्या बेरजेच्या राजकारणात काही फटी राहिल्याच हे मान्य करावेच लागेल. दिंडोरीसारख्या ठिकाणी डाव्या पक्षांना एखादी जागा सोडणे किंवा राजू शेट्टी यांच्याविरोधात उमेदवार न देणे किंवा प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात उमेदवार न उतरवणे यात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी फारसा उत्साह दाखविला नाही. आंबेडकरी विचारसरणीच्या छोट्या-मोठ्या नेत्यांना सोबत घेण्यासाठी काही विशेष प्रयत्न झाल्याचे दिसले नाही. महाविकास आघाडीने हे सोशल इंजिनीअरिंग साधले असते तर विरोधकांच्या ऐक्याला आणखी भरीवपणा आला असता हे नक्की! असो! किमान जागावाटपात आघाडी घेण्यात महाविकास आघाडीला यश आले हे ही नसे थोडके! आता महाविकास आघाडीने एकत्रित सभा, रॅलींचा धडाका लावून राज्यातील प्रचारातही आघाडी घ्यायला हवी. याबाबत आघाडीत अद्याप गती आलेली दिसत नाही.काँग्रेसने व्यापक जाहीरनामा प्रसिद्ध करून भाजपवर आघाडी घेतली आहे. राज्यातील महाविकास आघाडीने त्यापुढे जाऊन महाराष्ट्रासाठीचा महाविकास आघाडीचा वचननामा देऊन महायुतीवर ठोस आघाडी घ्यायला हवी. आघाडीतील दोन पक्ष हे प्रादेशिक आहेत. त्यांच्या दृष्टीने असा वचननामा आवश्यक ठरणार आहे. तशी ही निवडणूक उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्यासाठी अस्तित्वाची लढाई आहे. दोन्ही पक्ष घरातल्या फुटीमुळे बेजार आहेत. ते जर्जर झालेत की, उसळून वर येतायत हे या निवडणुकीत समजणार आहे. अशावेळी किमान विरोधकांचे ऐक्य अबाधित ठेवण्यात व ते मतदारांसमोर सादर करण्यात महाविकास आघाडीचे नेते यशस्वी ठरले हे चांगलेच! हे ऐक्य दाखवून महाविकास आघाडीने महायुतीवर निश्चितच आघाडी घेतली आहे, हे मात्र निश्चित!




# लढला नाही तरी चालेल,पण विकल्या जाऊ नकोस.

लोकसभा निवडणुकीचे वारे कोणा कोणाला अस्वस्थ करीत आहेत, तर काहीना पोटभर पंच पक्वान्ने खायला असून ही खायाला मन होत नाही.त्यामुळेच शांत झोप लागत नाही, काहीना किती ही धन खर्च हो विजय आपलाच झाला पाहिजे असे वाटत असल्यामुळे तो सर्वच खरेदी करण्याच्या तयारीने काम करीत आहेत. तर काही देशातील बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार,शिक्षण,आरोग्य यामुळे गेल्या नऊ वर्षात नागरिकांचे झालेले बेहाल यावर आकडेवारी देऊन पोटतिडकीने बोलत आहेत. त्यामुळेच त्यांना अत्यंत महत्वाचे..करो या मरो. असे लोकसभा निवडणुकीत झाले पाहिजे असे वाटत आहे. आणि माझ्या सारख्याला प्रत्येक जातीची मतदार संघातील लोकसंख्या डोळ्या समोर उभी राहत आहे. कोणत्या जातीचे लोक मतदार म्हणून प्रामाणिकपणे मत दान करतील तर कोणता उमेदवार खासदार म्हणून निवडून येऊ शकतो याची उपब्धतेनुसार आकडेवारी मांडतांना दिसत आहे.सरासरी पाच लाख मत मिळाल्यांनतर एक खासदार निवडून येतो.

तिन टक्के असलेला समाज पंधरा टक्केवाल्यांना पुढे करून पांच्याशी टक्केवाल्यांना कायम गुलाम लाचार बनवत असतो. त्यात गर्वसे कहो हम हिंदू है म्हणणारे बावन्न टक्केवाले तीन हजार सहाशे जातीत विभागलेले मागासवर्गीय ओ बी सी बहुजन समाजाच्या टक्केवारी नुसार एकत्र येऊन शक्ती दाखवत नाही. त्यासाठी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतले होते,लढला नाही तरी चालेल पण विकल्या जाऊ नको.

मतदासंघातील बहुजन समाजातील बावन्न टक्के ओबीसी बाजूला ठेवला तरी प्रत्येक मतदारसंघांमध्ये खालील प्रमाणे बौद्धांची संख्या आहे.१) मुंबई दीड करोडपैकी ४० लाख,२) नागपूर ३५ लाखापैकी १२ लाख,३) अमरावती २० लाखापैकी ८ लाख, ४) वर्धा पंधरा लाखापैकी ६ लाख,५) अकोला २० लाखापैकी ८ लाख, ६) सोलापूर १९ लाखापैकी ८ लाख, ७) औरंगाबाद वीस लाखापैकी ७ लाख, ८) नाशिक ३५ लाखापैकी ९ लाख, ९) सातारा २२ लाखांपैकीी ८ लाख,१०) अहमदनगर २२ लाखांपैकी ७ लाख,११) वाशिम १५ लाखापैकी ७ लाख,१२) बुलढाणा १५ लाखापैकी ७ लाख,१३) कल्याण डोंबिवली २० लाखापैकी ७ लाख. म्हणजेच ४८ पैकी १३ मतदारसंघ आंबेडकरी विचारांच्या बौद्धांचे खासदार कोणाचे सहकार्य न घेता निवडून येऊ शकतो त्यासाठी एकजूट दाखवून लढले पाहिजे. पण होऊ शकत नाही हीच मानसीकता बनलेली असेल तर असे लोक खुप अडचणी व समस्या निर्माण करण्यासाठी विकलेले असतात. तीच त्यांची गुणवंत कला कौशल्य असते, तो मग आपल्याच समाजात समाजा बद्दल,नेत्या बद्दल,कार्यकर्त्या बद्दल वैचारिक गैरसमज मतभेद निर्माण करण्यासाठी यशस्वी होत असतो. प्रथम असा लोकांना आपण ओळखले पाहिजे.

लोकसभा निवडणुकी नंतर विधानसभा निवडणूक येणार आहे.बौद्ध मतदारांना खरेदी करण्यासाठी सर्वच पक्षाचे उमेदवार सरसावले आहे.पण बौद्ध मतदाराना माझे आव्हान आहे कि तुम्ही तुमच्यावर झालेला अन्याय विसरु नका.भिमाकोरेगाव दंगल झाल्यानंतर प्रत्येक गावात झालेल्या दंगली विसरु नका.भाऊ,दादा,नाना,आबा,बाबा, ताईसाहेब,वहिनीसाहेब असे अनेक नेते आता बौद्ध मतदाराना भुरळ घालण्यासाठी बाबासाहेबांचे नांव दिवसरात्र घेत आहेत.त्यात १३३ वी भिम जयंती असल्यामुळे सर्वांचे प्रेम उतू चालले असेल.पण हिच वेळ आहे यांना त्यांची योग्य जागा दाखविण्याची.आणि जो आपल्या वेळेला धावुन येईल तोच,आपला नेता समजावा.असा नेता आंबेडकरी चळवळीतील समाजासाठी झटणारा कार्यकर्ता नेता म्हणजेच उमेदवार निवडून द्या. आणि आपले ताकत आपले मत वाया जाऊ देऊ नका,पक्ष फक्त आंबेडकरी विचार जपणारा असावे नेता आणि पक्ष बहुजन हिताची आणि एस सी,एस टी,ओबीसी जनतेला साथ देण्याची असावी.दारु,मटण,पैसा याला बळी न पडता.वंचित बहुजन आणि बौद्धांनी एकत्र राहून एक मताने मतदान करणे आवश्यक आहे.आता चुक केली तर येणारी पिढी हि गुलाम म्हणूनच जन्माला आल्या शिवाय राहणार नाही. म्हणूनच बहुजनानी आता एकच नारा दिला पाहिजे. बहुजन हिताय!बहुजन सुखाय!



बहुजन समाजातील मतदार बंधुनो,आपली स्वतःची ताकद ओळखा.तुम्ही कोणत्याही आंबेडकरी संघटनेशी एकनिष्ठ असा.परंतु यावेळेस मात्र तुमचे अमूल्य मत वंचित बहुजन आघाडीलाच द्यावे असे मी आवाहन करतो. कारण आत्तापर्यंत आपण दुसऱ्यांना मतदान केलेले आहे. त्याचा किती उपयोग झाला ते आपल्या सर्वांना माहीत आहे. उलट नुकसानच झाले आहे.आता मात्र तुमचे मत वाया घालवू नका.सर्वांनी सर्व हेवे - देवे विसरून मतदान केले तर १० तरी खासदार निवडून येऊ शकतात.आणी आमदारकीला ५० पेक्षा अधिक आमदार येऊ शकतात. म्हणजे मुख्यमंत्री सुद्धा आपलाच होऊ शकतो. होऊ शकते ही इच्छाशक्ती आणि मानसिकता तयार करून ठेवा.

मान्यवर कांशीराम यांनी हे उत्तर भारतात चार वेळा करून दाखवले. त्यासाठी त्यांनी केलेले कार्य प्रबोधन कष्ट,त्याग पडीक जमिनीवर केलेली मशागत म्हणजे स्वाभिमान गमावलेल्या बहुजन समाजात न बिकने वाला समाज तयार केला तेव्हा चार वेळ सरकार बनले.एड प्रकाश यशवंतराव आंबेडकर यांनी ही स्वबळावर अनेक प्रयोग करून दाखवले म्हणूनच आज राज्यात त्यांची राजकीय शक्ती म्हणूनच दखल घेतली जाते. त्यांची शक्ति आपण सर्व आहोत.बाकी बाबासाहेबांच्या नावाचा जय जय कार करणारे रोजनदारी,सलगडी म्हणून निळा झेंडा खांद्यावर घेऊन स्वताच्या पोटासाठी आणि अस्तित्वासाठी काम करतांना दिसतात.त्यांना समाजाचे आंबेडकरी विचारांचे आणि संविधानाचे काही घेणे देणे नाही.काही बुद्धिजीवी विचारवंत घरात बसून आपली विद्वता पणाला लावून वैचारिक मतभेद निर्माण करण्यासाठी डोळ्यात तेल घालून लिहत आहेत. म्हणूनच त्यांना ही सांगणे आहे.लढला नाही तरी चालेल,पण विकल्या जाऊ नकोस.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर,मान्यवर कांशीराम यांनी सांगितले होते.आणि आता बाळासाहेब एड प्रकाश आंबेडकर सांगत आहेत.हे निवडणूक स्वताच्या अस्तित्वाची असणार आहे. ही ताकद लोकसभेत दिसली तर पुढे तुमच्या आंदोलनाला तलवारीची लेखणीची धार असणार आहे.अन्यता मतदार संघातील मतदारांची संख्या ही गुलाम लाचार लोकांची नव्हे मुक्या जनावरांची गणल्या जाईल.हे प्रत्येक आंबेडकरी विचारांच्या मतदारांनी लक्षात ठेवावे.म्हणूनच कोणाचे नुकसान होईल कोणाचा फायदा होईल यांचे गणित करत बसू नका.आदेशाची निर्णयाची अंमलबजावणी करा. विजय आपलाच संख्येच्या बळावर गणिताच्या सूत्रानी होऊ शकतो.एकमेकावर आणि महापुरुषांच्या विचारावर विश्वास ठेवा.नसेल तर घरात बस.उपाशी मरा.पण दररोज श्रम विकून पोट भरता तसेच मत विकून पोट भरू नका,त्याची शिक्षा पाच वर्ष नव्हे पिढ्यान पिढ्याला भोगावी लागते हे लक्षात ठेवा.म्हणूनच वंचित बहुजना,बौद्ध म्हणून घेणाऱ्या मतदारा.लढला नाही तरी चालेल,पण विकल्या जाऊ नकोस.इतिहास लढणाऱ्यांचा लिहल जातो. लाचारी करणाऱ्या भटांचा भाटांचा नाही.

*********

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# सदानंद दाते करत आहेत, अशा कठीण काळात काम करणे आम्हाला नसते जमले

ज्युलिओ रिबेरो भारतीय पोलीस सेवेने आपल्या ७० वर्षांमध्ये जी तेजस्वी रत्ने दिली, त्यापैकी एक आहेत, महाराष्ट्र केडरचे सदानंद दाते. राज्यघटना आणि कायद्यावरील निष्ठेपेक्षा सत्तेत असलेल्या पक्षावरील निष्ठेला प्राधान्य दिले जात असतानाच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून काम केले आहे. माझ्या पिढीच्या अधिकाऱ्यांवर ही वेळ आली नव्हती.ते ज्या समाजातून आले आहेत, तो सत्य आणि न्याय, मूल्य प्रणाली, साधी राहणी, उच्च विचारसरणी यासाठी ओळखला जातो. सदानंद दाते यांच्या व्यक्तिमत्त्वात ते सर्व गुण सामावलेले आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी भारतीय पोलीस सेवेत प्रवेश केला. लहानपणापासून असलेली बेताची परिस्थिती त्यांच्या या ध्येयाच्या आड आली नाही.सर्वत्र कौतुकास्पद असलेल्या या माणसाची महानगराच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती झाली असती तर मुंबईकरांना खरोखरच आवडले असते. पण सदानंद दाते हे चुकीची कामे करण्यासाठी होणाऱ्या विनंतीला बधणारे नाहीत, हे जाणकारांना माहीत आहे. त्यामुळे नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सी म्हणजेच एनआयएचे महासंचालक दिनकर गुप्ता यांच्या जागेवर सदानंद दाते यांची नियुक्ती व्हावी यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नव्हते.अलीकडेच मी 'द बॅकरूम मिश्चिफ मेकर्स' हा निवृत्त आयएएस अधिकारी मॅथ्यू जॉन यांचा लेख वाचला. या लेखात त्यांनी नोकरशाहीची, विशेषत: भारतीय पोलीस सेवा आणि भारतीय महसूल सेवा यांच्याशी संबंधित यंत्रणा आणि त्यातील अधिकाऱ्यांवर कठोर टीका केली आहे. या यंत्रणा राजकारण्यांनी वाकायला सांगितले तर रांगायला सुरुवात करतात, असे लेखकाचे म्हणणे आहे. या लेखात इडीचा उल्लेख आहेच शिवाय सीबीआय आणि एनआयएचाही उल्लेख आहे.तीन–चार वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील आणखी एक उत्कृष्ट आयपीएस अधिकारी सुबोध जैस्वाल यांची सीबीआयच्या प्रमुखपदी निवड करण्यात आली होती. त्यांनी फारसा गाजावाजा न करता काम केले. त्यांना मुदतवाढ मिळाली नाही किंवा सेवानिवृत्तीनंतर आणखी काही पदे आणि इतर फायदे मिळाले नाहीत. ही खरे तर त्यांच्या सचोटीला मानवंदनाच आहे. जे सत्तेपुढे झुकतात, त्यांना त्याचे बक्षीस मिळते, हे एक उघड सत्य आहे. सुबोध जयस्वाल कोणापुढेच झुकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.सदानंद दाते यांच्या नेतृत्वाखालील एनआयएदेखील कितीही दबाव आला, तो कितीही असह्य झाला तरीही कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करणार नाही, याची मला खात्री आहे. सदानंद दाते हा एक असा माणूस आहे ज्याने जबाबदारी स्वीकारण्याआधीच त्याच्या अटी निश्चित केल्या असतील. सदानंद दाते यांनी तसे केले असेल, (मला खात्री आहे की त्यांनी तसे केले असेलच,) तर वर सांगितल्याप्रमाणे मॅथ्यू जॉनसारख्यांना त्यांनी केलेल्या केंद्रीय यंत्रणांच्या यादीतून एनआयएचे नाव काढून टाकावे लागेल.मॅथ्यू जॉन यांनी ईडी, सीबीआय आणि एनआयए यांचे 'बॅक रूम मिश्चिफ मेकर्स' असे वर्णन केले आहे. या यंत्रणा 'विरोधी पक्षातला भ्रष्टाचार संपावा' अशी इच्छा असलेल्या राजकारण्यांच्या दृश्य 'आघाड्या' आहेत. या 'भ्रष्ट' विरोधी नेत्यांना लोकसभा निवडणुकीआधीच ते 'भ्रष्ट' आहेत, असे दाखवून तुरुंगात टाकले गेले आहे. निवडणुकीआधी सत्ताधारी पक्षाचा उंबरा ओलांडणाऱ्यांचीच पापे माफ होतात.या 'बॅक रूम मिशिफ मेकर्स' मध्ये सनदी सेवेतून निवृत्त झालेले बरेच जण आहेत, असे मी म्हटले तर मॅथ्यू जॉन यांनी मला माफ करावे. दुसरे म्हणजे,



मॅथ्यू जॉन यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की या नागरी सेवांमधील आमचे उत्तराधिकारी आमच्यापेक्षा अधिक कठीण आणि धोकादायक काळात कार्यरत आहेत. आजच्या काळामधले अनेक नागरिक शहराचा प्रभारी पोलीस अधिकारी म्हणून मी परत यावे अशी इच्छा व्यक्त करतात तेव्हा मी ताबडतोब कबूल करतो की मी सध्याची व्यवस्था हाताळू शकणार नाही.आहे या वस्तुस्थितीशी दोन हात करायचे की सोडून निघून जायचे असे दोनच पर्याय सध्या आहेत आणि त्यातून निवड करणे भाग आहे! पन्नाशीच्या जवळ आल्यावर किंवा तो महत्त्वाचा टप्पा ओलांडल्यावर बरेचजण सोडण्याच्या मनस्थितीत नसतात. सदानंद दाते यांच्या दर्जाच्या अधिकाऱ्याची तीन वर्षांपूर्वी ठाणे किंवा नागपूरचे पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती व्हायला हवी होती. त्यांच्या सचोटीचा आणि कर्तृत्वाचा फायदा या शहरांतील लोकांना आणि तेथील पोलीस कर्मचाऱ्यांना झाला असता. पण सत्तेत असलेल्यांना असे अधिकारी 'सोयी'चे नसतात, हे वास्तव आहे.वृत्तपत्रे असे म्हणत आहेत की या वर्षी पहिल्यांदा मतदान करणाऱ्या बहुसंख्य मतदारांनी आपल्या नावाची नोंदणी केलेली नाही. यात आश्चर्यकारक काय आहे? राहुल गांधींचे नाव घेतले तर जोरदारपणे खिल्ली उडवली जाते. आणि अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठेच्या समारंभातील नरेंद्र मोदींचा वावर आणि द्वारकेच्या समुद्रात त्यांनी डुबकी घेतल्यानंतर, टीका होते, पण ती अगदी हलकी असते. लोकशाहीच्या जननीचे जे काही चालले आहे, त्याबद्दल तरूण मतदार नाराज आहे, हे उघड आहे. जे. पी. नड्डा यांच्या कार्यालयात भ्रष्ट विरोधी नेत्यांचा तमाशा रोजचाच झाला आहे. त्यांना पक्षात प्रवेश देऊन विविध पदे देणे किंवा पक्षाच्या वरिष्ठ पदांवर थेट नियुक्ती करणे यामुळे आमच्या तरुणांचा भ्रमनिरास झाला आहे. अधिक श्रीमंत कुरण शोधणाऱ्या किंवा कायद्याच्या कचाट्याला चकवा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या राजकारण्यांपेक्षा ते अधिक चांगल्या रोजगाराच्या संधी शोधतात.दररोज सकाळी वर्तमानपत्रे वाचून मला मिळालेली आणखी एक चिंताजनक माहिती म्हणजे ६८% सैनिक शाळा आता संघ परिवार किंवा त्यांच्या सहयोगी संस्थांद्वारे सार्वजनिक–खासगी भागीदारी योजनेअंतर्गत चालवल्या जातील. नॅशनल डिफेन्स अकादमी किंवा आयएमएमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रामुख्याने मुलांना तयार करण्यासाठी या सैनिक शाळांची स्थापना करण्यात आली होती.या संस्कारक्षम मनांना इतक्या लहान वयात राजकीय विचारसरणीचा परिचय करून देणे हे संकटाला आमंत्रण देणारे आहे. जनरल झिया–उल–हक यांनी दहा वर्षे पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष म्हणून राज्य करताना पाकिस्तानच्या सशस्त्र दलांचे इस्लामीकरण केले. याचे परिणाम खरोखरच भयानक होते. ब्रिटिश परंपरेत प्रशिक्षित झालेली शिस्तबद्ध यंत्रणा धार्मिक कट्टर यंत्रणा बनत गेली. या पद्धतीने पाकिस्तानची स्थिती हळूहळू बिघडत जाऊन तो एक अपयशी देश बनला.बरेच आधी निवृत्त झालेल्या काही अधिकाऱ्यांनी आपल्या देशाबाबतही अशीच भीती सार्वजनिक पातळीवरून व्यक्त केली आहे. त्यांचे म्हणणे ऐकले जाईल का? सध्या राजकीय उतरंडीच्या शीर्षस्थानी निव्वळ धार्मिक उन्माद आहे. सध्याच्या या स्थितीत कोणीही काहीही ऐकायला तयार असेल का याबद्दल मला शंका आहे!पण आशेचा किरण आहे. गृहमंत्री अमित शहा जर सदानंद दाते यांच्यासारख्या निष्पक्ष अधिकाऱ्याला त्यांच्या मंत्रालयाशी संबंधित महत्त्वाच्या यंत्रणेच्या प्रमुखपदी नियुक्त करू शकत असतील तर आपण हृदयपरिवर्तनाची आणि तर्कशुद्ध विचारसरणीची आशा का करू नये?

# जास्त वेळ एकाच ठिकाणी बसून काम केल्यास होऊ शकतात 'हे' आजार



बराच वेळ एका जागी बसूने आरोग्यासाठी घातक ठरू शकते. जास्त वेळ बसून राहिल्याने अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. या समस्यांना कसे सामोरे जावे हे जाणून घेऊया.एकाच जागी जास्त वेळ बसून काम केल्याने आरोग्यावर पुढील दुष्परिणाम होतात लठ्ठपणा वाढतो जास्त वेळ एकाच जागी बसून काम केल्याने वजन वाढू शकते. वजन वाढल्याने अनेक आजार निर्माण होऊ शकतात. एकाच जागी बसल्याने कॅलरीज् बर्न होत नाही. यासाठी रोजच्या दिनचर्येत व्यायाम आणि योग करावा.हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांचा धोका दीर्घकाळ बसून काम केल्याने हृदयविकार आणि स्ट्रोकसह हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार वाढू शकतात. असे रक्तप्रवाह आणि पचन सुरळित होत नसल्याने होते. यासाठी काम करताना एका तासाने उभे राहावे किंवा चालावे. हृदयाचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी पोहणे, चालणे , योग करणे गरजेचे आहे.शरीराचा आकार खराब जास्त वेळ बसून काम केल्याने पाठ वाकणे, मणक्याचा त्रास सुरू होऊ शकतो. यामुळे काम करताना ताठ बसावे. बसायला योग्य खुर्ची घ्यावी. काम करण्यासाठी एक जागा निश्चित करावी. तसेच काम करताना ५ ते १० मिनिटांची विश्रांती घेऊन फिरून यावे.टाइप २ मधुमेहाचा धोका एकाच जागी बसून जास्त वेळ काम करत असाल तर टाइप २ मधुमेहाचा धोका वाढू शकतो. कमी झालेल्या इंसुलिनची संवेदनशीलता आणि बिघडलेले ग्लुकोज चयापचय यामुळे हा आजार होऊ शकतो. अशावेळी रोज सकाळी व्यायाम किंवा योगा करावा. तसेच तुम्ही कामातून थोडा वेळ काढून फिरून येऊ शकता.जास्तवेळ बसून राहिल्याने पाठदुखी, मानदुखी आणि सांधेदुखी वाढू शकते. एकाच जागी बसून काम केल्याने स्नायूंची हालचाल होत नाही. यामुळे काम करताना थोडा वेळ उभे राहावे, चालायला जावे किंवा हात आणि पायांना स्ट्रेच करावे. तसेच तुम्ही फिजिकल थेरेपि घेऊ शकता.मानसिक आजार जास्तवेळ बैठे काम केल्याने मानसिक आरोग्य धोक्यात येऊ शकते. यामध्ये नैराश्य आणि तणाव वाढू शकतो. रोजच्या दिनचर्येत व्यायाम आणि योगाचा समावेश करावा. व्यायाम केल्याने मुड चांगला राहतो तसेच नैराश्य आणि तणाव कमी होतो. यासाठी पाच मिनिटं फिरून यावे किंवा स्ट्रेचिंगल करावे.आयुर्मान कमी होणे काही अभ्यासांनी असे सुचवले आहे की जास्तवेळ बसून काम केल्याने आयुर्मान कमी होऊ शकते. यामुळे बैठे काम असले तरी थोडावेळ ब्रेक करून बाहेर फिरूण यावे. यामुळे शरीराची थोडी हालचाल होते. यामुळे आरोग्य निरोगी ठेवण्यास मदत मिळते. बैठे कामामुळे होणारे आजार दूर ठेवायचे असेल तर चालणे, विश्रांती घेणे, तसेच योग करणे यासारख्या गोष्टी कराव्या.डिस्क्लेमर : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. सकाळ माध्यम समूह अशा कोणत्याही गोष्टींची पुष्टी करत नाही. अधिक तपशीलांसाठी तुम्ही तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊ शकता.

# आदर्श समाज संरचनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती संपूर्ण विश्वामध्ये १४ एप्रिल २०२४ या दिवशी साजरी होत आहे त्यानिमित्त त्यांना प्रथमतः विनम्र अभिवादन. यावर्षी बाबासाहेबांच्या जयंतीचा महिना आणि भारतीय लोकशाहीचा उत्सव साजरा होत आहे हा ही एक योगायोगच कारण ज्या महापुरुषांनी खंडप्राय विशाल देशासाठी जगात आदर्श लोकशाही रचनेचे संविधान दिले आणि त्यावरच भारताची प्रगती होत आहे. त्या देशाच्या संसदीय निवडणुकीत सर्व भारतीयांना एक व्यक्ती एक मताचा जो अधिकार मिळालेला तो हक्क बजावला पाहिजे व आपल्या कल्पनेतले आपल्यासाठी, समाजासाठी योग्य प्रतिनिधी कोणता ते आपण निवडून देणे हे आपले कर्तव्य आहे.

अथांग सागर एक करुनी शाई बनवली जरी, कोटी कोटी कालीदास हे लिहिण्या बसले जरी, तरी न पूर्ण होईल भीमायन अशी काव्यपंक्ती बाबासाहेबांना लागू पडते कारण बाबासाहेबांचे कार्य हे केवळ एकाच घटकाला मर्यादित नाही तर ते अमर्यादित आहे. सामाजिक, राजकीय आर्थिक अनेक क्षेत्रात त्यांचे दैदीप्यमान कार्य आहे.

आदर्श भारतीय समाज संरचनेचे शिल्पकार या दृष्टीने जर विचार केला तर बाबासाहेबांचे खूपच मोठे योगदान आहे कारण मानवी मूल्यांचे स्वातंत्र्य, समता, बंधुता यावरच आदर्श समाजाची पायारचना असते. ज्या देशातील समाजात खूप मोठ्या प्रमाणात विषमता आहे. मानव जाती–धर्मात, उच्चनीचता, प्रतिष्ठित, अप्रतिष्ठित, स्पृश्य–अस्पृश्य अशा घटकांत विभागणी धर्माच्या आधारावर खोट्या धार्मिक अंधश्रद्धेतून, पूर्वजन्मीच्या पाप कृत्यातून जन्माने मिळालेली शिक्षा भोगण्यासाठीच्या जाती आणि त्यात त्या व्यक्तींचा जन्म म्हणून त्यांना ती खालची जात समजून त्या विशिष्ट खालच्या तळाच्या जातीने वरच्या उच्च जातींची गुलामगिरीच केली पाहिजे हा दंडक निर्माण केला गेला होता म्हणजेच देशातील सामाजिक संरचना ही निरोगी नव्हती तर ती विषमतावादी आजारी होती.

आजारी असलेल्या समाजाला निरोगी बनवण्यासाठी एका विद्वान डॉक्टरची गरज होती आणि तो डॉक्टर म्हणजेच भीमराव रामजी आंबेडकर या भारतात जन्मलेला युगपुरुष म्हटले तर वावगे ठरणार नाही. गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्याशिवाय तो बंड करू शकणार नाही है ओळखून बाबासाहेबांनी सर्व गुलामांना संघटित केले त्यांना जाणीव करून दिली की तुम्हाला या गुलामगिरीतून मुक्त व्हायचं असेल तर मी सांगितल्याप्रमाणे करा,

बाबासाहेबांचा सामाजिक सुधारणेचा लढा म्हणजेच काही साधी गोष्ट नव्हती. कारण ५००० वर्षांपासून येथे विषमतावादी समाजरचना निर्माण झालेली होती. त्या समाजरचनेला हादरा देणे म्हणजे येथील कर्मठ, सनातनी, धर्ममार्तंडांना अंगावर घेणे. ही बाब तत्कालीन काळात तर खूपच अवघड होती. तरीही बाबासाहेबांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, रक्ताचा थेंबही न सांडता,

मानवी मन परिवर्तन करण्याची लढाई ही मैदानात परकीयशत्रूबरोबर लढण्यापेक्षाही भयंकर होती. म्हणूनच त्यांना भोर लढवध्ये म्हटले जाते.. सामाजिक क्रांतीच्या लब्धाची सुरुवात बाबासाहेबांनी महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहाणे २० मार्च १९२० ने केली.

पाणी हे निसर्गाची देणगी आहे जेथे गाई गुरे, जनावरे, पशू पाणी पितात पण दलितांनी पाणी पिण्यास, भरण्यास सक्त मनाई होती त्याविरुद्ध लढा देऊन महाड येथे सत्याग्रह करून पाणी ऑजळीत घेतले व समस्त दलितांनां पाण्याला स्पर्श करायला लावले. हा लढा समतेसाठी उभारता होता म्हणून महाड चवदार तळे सत्याग्रहाबद्दल म्हटले जाते 'पाण्यालाच आग लावली भीमराव आंबेडकरांनी या सत्याग्रहाचा वनवा देशभर पेटला व अनेक ठिकाणी पाण्यासाठी पुढे सत्याग्रह सुरू झाले.

२६ जून १९२७ ला अमरावती येथील प्राचीन अंबादेवी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी डॉ. बाबासाहेबांचा सत्याग्रह पंजाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाला होता. तर १९२९ ला पुण्यातील पर्वती टेकडीवरील मंदिरे अस्पृश्यांना खुले नव्हती हा बाबासाहेबांचा अमरावतीनंतरचा मंदिर सत्याग्रह होता.

डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी जे लढे दिले त्यात काळाराम मंदिर सत्याग्रहाचे महत्त्वाचे स्थान आहे फक्त हिंदूंनाच नव्हे तर सत्ताधारी इंग्रजांनाही जाग यावी आणि त्यावेळच्या दलितांना, शोषितांना सर्व मूलभूत हक्क मिळावेत यासाठी त्यांनी हा लढा उभारला होता. हा लढा २ मार्च १९३० ला सुरू झाला आणि पुढील ५ वर्ष चालत राहिला. बाबासाहेबांचा प्रत्येक लढा हा दैववादासाठी किंव कोणत्या देवावर श्रध्देसाठी नव्हता तर तो मानवी हक्कांसाठी, समानतेसाठी, न्यायासाठी होता. स्त्रियांना सुद्धा सन्मानाने जगता यावे यासाठी विविध योजना, तरतुदी, संरक्षणार्थ कायदे केले कारण कुटूंबात स्त्री ला सन्मान मिळाला तर कुटूंबांचा विकास होतो परिणामी समाजाचा व देशाचा हे त्यांना माहित होते.

मी प्रथमतः भारतीय आहे आणि अंतिमतःही भारतीयच आहे हा विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिला आहे. या विचाराचा पाईक होण्याचा प्रयत्न करताना प्रत्येकाने पहिल्यांदा राष्ट्रहिताचा विचार करायला हवा.

डॉ. बाबासाहेबांनी या देशाला संविधान दिले देशातील अठरापगड जाती–धर्माना समतेच्या माळेत गुंफल देशवासी यांच्या हिताचे कायदे केले उच्च–नीच्य, स्पृश्य, अस्पृश्य, गरीब, श्रीमंत हा भेदभाव न ठेवता सर्वांना समान अधिकार बहाल केले, स्वाभिमानाने, सन्मानाने जगण्याचा, व्यवसाय स्वातंत्र्याचा अधिकार दिले पण है अधिकार देताना जर कोणी या अधिकाराचा गैरवापर देशविघातक, समाजविघातक करणाऱ्या कृत्यासाठी करणाऱ्यास शिक्षा, जरब बसवणारे कडक कापदेही केले. देशात कोणत्याही धार्मिक जातीय किंवा महामारी अराजकता यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास संविधानात कलम १४४ लागू करण्याचा शासनाला अधिकार देऊन शांतता प्रस्थापित करता येते. खरं पाहता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे सन १९१८ साली भारतीय क्षितिजावर भारतीय क्षितिजावर त्यांचे राजकीय व सामाजिक नेतृत्व उदयास आले. पाच काळात ते ज्ञानदान आणि नेतृत्व करत होते राष्ट्राच्या उभारणीत अमूल्य असे योगदान देत होते समस्या सोडवण्यासाठी धोरणे सुचवण्याची पद्धती त्यांच्या समकालीन नेत्यापेक्षा वेगळी होती. एखाद्या समस्येचा सखोल अभ्यास करून कारणे ओळखून मगच उपाय शोधण्याची शिस्त त्यांच्यात होती. पाणी हे राष्ट्राची संपत्ती आहे तिचे सम पातळीत वाटप करण्यासाठी जे प्रदेश सतत दुष्काळग्रस्त असतात, ज्या ठिकाणी बारामाही वाहणाऱ्या नद्या नाहीत अशा ठिकाणी वाहणाऱ्या मोठ्या नद्यांचे पाणी लहान लहान नद्यात सोडून नदीजोड प्रकल्प केला तर पाण्याची समस्या सुटेल. त्यांनी सुचवलेले असे अनेक उपाय हे आजही राष्ट्रापुढील समस्यांचा सामना करण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. राष्ट्र निर्माणाच्या प्रक्रियेत तसेच लोकशाहीच्या संवर्धनासाठी शिक्षणाचे अत्यंत महत्व आहे. डॉ. बाबासाहेब या संदर्भात म्हणतात, लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता, समाज, नैतिक मूल्याधिष्ठित शिक्षणाद्वारे संस्कारित असावा लोकशाहीसाठी सुशिक्षित समाजाची अत्यंत गरज आहे. शिक्षित, नैतिक, मूल्याधिष्ठित समाजाची लोकशाही ही हमखास यशस्वी ठरेल. राष्ट्रनिर्माण हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनाचा मुख्य हेतू होता. त्या हेतूचा मुख्य आधार शिक्षण आहे. शिक्षण ही पवित्र संस्था आहे शाळेत मने सुसंस्कृत होतात. शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र होय.

नैतिक मूल्याधिष्ठित प्राथमिक शिक्षणातूनच विद्यार्थ्यांवर सुसंस्कार केले तरब आदर्श निरोगी समताधिष्ठित समाज निर्माण होतो. पण आजच्या शिक्षण पद्धतीत खरोखरच तसे प्रयत्न होत आहेत जगाने ज्यांना सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून स्विकारले त्या देशातील प्रत्येक शाळेत समोरच्या दर्शनी भिंतीवर बाबासाहेबांचा फोटो लावला पाहिजे कारण त्यातून विद्यार्थ्यांना खूप शिकण्याची प्रेरणा मिळते पण दुदैवाने म्हणावे लागेल की तसे न होता आजही आमच्या सुशिक्षित समजलेल्या सडक्या मानसिकतेत बसत नाही म्हणून तसे बहुतारा ठिकाणी दिसत नाही. अपवादात्मक ठिकाणी सकारात्मक चित्र दिसते ही...

लेखक
कांबळे गौतमकुमार नागनाथराव
नाथनगर, लातूर चे ९०२२१७२८१८

# त्वचाविकार आणि मधुमेह नेमका काय संबंध?

डॉक्टर मला डायाबेटीस नाही. माझी जखम लगेच सुकते. कधीच चिघळत नाही. पस्तीस वर्षांचा रमेश मला सांगत होता. मी तरीही त्याची रक्तातली साखर तपासली. ती २८० मिलिग्रॅम होती. म्हणजे त्याला मधुमेह होता. कित्येकांचा असा समज असतो की, आपली जखम लगेच भरते याचा अर्थ आपल्याला मधुमेह नाही. रमेशला हल्ली शरीरावर केसपुळ्या येण्यास सुरुवात झाली होती. आठवड्या – दोन आठवड्यांनी एखाद दुसरी केसपुळी त्याला येत होती. हे देखील मधुमेहाचे लक्षण होते. मधुमेही व्यक्तींपैकी जवळपास निम्म्या व्यक्तींना त्वचेवर त्या आजाराची काही ना काही तरी लक्षणे दिसून येतात. आपण आज त्याबद्दल माहिती घेऊया. त्वचाविकारही मधुमेहाचे लक्षण तसं पाहिलं तर लघवी जास्त होणे, तहान जास्त लागणे व भूक जास्त लागणे ही मधुमेहाची सर्वसामान्य लक्षणे आहेत. त्याचबरोबर एखाद्या व्यक्तीचं वजन काही दिवसात किंवा काही महिन्यापासून कमी होत असेल तर तेही एक मधुमेहाचे लक्षण असू शकतं. कधी कधी मात्र त्वचारोगामुळेदेखील एखाद्या व्यक्तीस असलेल्या मधुमेहाचे प्रथमच निदान केले जाते. मधुमेही व्यक्तींमध्ये खालील त्वचाविकार दिसून येतात.जंतूसंसर्गची शक्यता अधिक मधुमेहामुळे एखाद्या व्यक्तीस जंतूसंसर्ग होण्याची शक्यता वाढते. वारंवार केसपुळ्या किंवा गळवे येणे, जखम चिघळणे, हाताला किंवा पायाला जीवाणू संसर्ग होऊन हात किंवा पाय लाल होणे व तिथे सूज येणे व फार दुखणे, अंगावर खटे येणे, पाठीवर किंवा अंगावर कुठेही काळपुळी येणे, कान वहाणे, नखाची शिवण वारंवार जंतू संसर्गामुळे सुजणे व दुखणे या प्रकारचे जीवाणू संसर्ग मधुमेहामध्ये दिसून येतात.काळपुळी ज्यांचा मधुमेह नियंत्रणामध्ये नाही अशा व्यक्तींमध्ये काळपुळी दिसून येते. केसपुळी मध्ये फक्त एक केस व त्याच्या आसपासच्या भागाला जीवाणूसंसर्ग झालेला असतो, तर काळपुळीमध्ये आसपासच्या अनेक केसांना एकाच वेळी जीवाणूसंसर्ग होतो. तेथील त्वचा वड्यासारखी फुगते, लाल होते व फार दुखते व आग आग होते. प्रतिजैविकांच्या आधीच्या काळामध्ये अशा काळपुळीच्या गुंतागुंतीमुळे मधुमेही व्यक्ती मृत्यू पावत असत. त्यामुळे या आजाराला काळ (ज्याचा एक अर्थ यम असा आहे) पुळी हे नाव दिले गेले आहे.बुरशीजन्य आजार पुरुषांच्या जननेंद्रियांवर विशेषतः शिस्नमुंडावर दह्यासारखी सफेद रंगाची बुरशी येते. तसेच शिश्नमुंडाच्या भोवतालच्या त्वचेला सूज येऊन तिथे चिरा पडतात व ती त्वचा मागे घेताना त्रास होतो. तसेच स्त्रियांच्या योनीमार्गामध्ये अशाच प्रकारची बुरशी तयार होते व त्यामुळे तिथे खूप खाज येते व अंगावरून सफेद जाते. रजोनिवृत्ती झालेल्या वयस्क स्त्रियांनादेखील जर हा त्रास अचानक सुरू झाला असेल तर तेही एक मधुमेहाचे लक्षण आहे. प्रौढ व्यक्तीच्या अंगावर भरपूर गोल गोल खाजरे नायटे येणे किंवा पायाच्या




बेचक्यात तसेच त्याच्या वर व खाली नायटा होणे हे देखील कधीकधी मधुमेहाचे लक्षण असू शकते. तसेच छाती – पाठीवर व हातांवर जास्त प्रमाणात व वारंवार सुरमा किंवा शिबे होणं हे देखील कधीकधी मधुमेहाचे लक्षण असू शकतं.त्वचेवर येणाऱ्या काही विकारांची लक्षणे मानेची (पाठची व दोन्ही बाजूची), तसेच काखेची त्वचा ही जाड व काळपट होणे, चेहरा व तळहात, तळपाय लालट होणे, हातापायांची त्वचा कोरडी होणे, काखेत व मानेवर छोटी – मोठी त्वचेच्या रंगाची किंवा काळपट चामखीळे येणे, नखांचा रंग पिवळट होणे, पायांवर पुढच्या बाजूला काळपट किंवा तपकिरी रंगाचे डाग येणे अंगाला काहीही पुरळ न येता नुसती खाज येणे ही देखील मधुमेहाची लक्षणे आहेत.मधुमेहामध्ये आढळून येणारे काही त्वचारोग – मधुमेहामध्ये संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता वाढते हे आपण वर पाहिलेच. पण मधुमेही व्यक्तींना कोड, सोरियासिस, काखमांजऱ्या इत्यादी त्वचारोग होण्याची शक्यतादेखील जास्त असते. मधुमेही नसा दाहाचा त्वचेवर होणारा परिणाम मधुमेह बरेच वर्षांपासून असेल व तो तितकासा नियंत्रणामध्ये नसेल तर हातापायांच्या नसांवर त्याचा प्रभाव पडून नसांचा दाह होतो व त्यामुळे हातापायांना मुंग्या येणे, काटे टोचल्यासारखे वाटणे, हातापायांना कमकुवतपणा येणे, हात पाय सुन्न पडणे अशी लक्षणे पाहावयास मिळतात. तळपाय सुन्न झाल्यामुळे चपलेतला एखादा बाहेर आलेला खिळा, तसेच अनवाणी चालल्यास टोकदार दगड, काटा किंवा गरम निखारा तळपायास लागल्यास ते समजत नाही व तिथे जखम होते. जखम झाली तरी तो भाग सुन्न असल्यामुळे ती व्यक्ती जखमेवर जोर देऊन नेहमीसारखी चालते. त्यामुळे अशी जखम बरी न होता ती वाढत जाते. याला असे म्हणतात. जसा मधुमेहाचा प्रभाव हातापायांच्या नसांवर होतो, तसाच शरीरातील अनुकंपी चेतासंस्थेवर देखील होतो.

# ३१ मार्च १९९० ला भारत सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन मरणोत्तर सन्मान केला होता. या विषयावर ४० वी वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करून वैचारिक आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी समग्र आंदोलन समजून घेणे आवश्यक आहे. आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ३१ मार्च १९९० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारत सरकारने 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मान केला होता. याची जाणीव ठेवून त्या कृतीच्या ३४ व्या वर्धापनदिनानिमित्त विचारमंथन व्हावे म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या विद्यमाने ४० व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ३१ मार्च २०२४ ला आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते डॉ. आर. डी. बडगे यांनी केले. ते याप्रसंगी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ण व्यवस्थेच्या विरोधातील लढा सुरू केला होता. १९११ ची जनगणना होत असताना गव्हर्नर सी. एस. हटन यांना निवेदन सादर केले होते. ज्यात हिंदू आणि अस्पृश्यांचा देव एक नाही. असे दहा मुद्दे तयार करून अस्पृश्य हे हिंदू धर्माचा भाग नाही हे सिद्ध करून उपेक्षित वर्ग ही संज्ञा प्राप्त करून घेतली. ज्या बळावर गोलमेज परिषदेत आपले हक्क आणि अधिकार मिळवून घेतले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नीतिमत्तापूर्ण व्यथित केले आहे. भारताचे संविधान बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. ५ जून १९५२ ला कोलंबिया विद्यापीठाने एल एल डी तर १९५३ ला उस्मानिया विद्यापीठाने डी. लिट दिली आहे. अशा अनेक पदव्या मिळवल्या होत्या ज्यामुळे त्यांना सिंबॉल आफ नालेज म्हटले जाते.

या प्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, जयंती निमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन भीम विचारांचा महोत्सव साजरा केला पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, २१ जानेवारी १९५४ ला भारतरत्न या पुरस्काराची योजना स्विकारण्यात आली. १९१३






ला लार्ड मेकाले यांनी सर्वासाठी शिक्षण प्रणाली आणली ज्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांसह अनेकांना शिक्षण घेता आले. माधवराव बागल यांनी बाबासाहेब हयात असताना कोल्हापूरात पुतळा उभारला आहे. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, जयंती निमित्त जमा होण-या पैशाचा ब-याच ठिकाणी नीट वापर होत नाही. अनेक विहारात भंते जी तळ ठोकून बसले आहेत जे धम्म प्रचार करताना दिसत नाही. एड. व्ही. डी. रामटेके म्हणाले की, मैत्ता सिद्धांतानुसार समाजाची पुनर्रचना केली पाहिजे. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय अंतर्भूत असणारे बुद्ध तत्त्वज्ञान बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला दिले आहे. भीमराव धाकडे म्हणाले की, मान्यवर कांशीराम यांच्या दबावामुळे त्या काळात संसदेत तैलचित्र लावणे, मंडल च्या विरोधातील कमंडल यात्रा रोखने व डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न बहाल करण्यात आले.

प्रमुख वक्ते म्हणाले एड. राजू बागूल म्हणाले की, तीन दशकानंतर दखल घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. जगात आंतरराष्ट्रीय स्तरावर जयंती साजरी करण्याचे प्रस्ताव पास करण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारांना केंद्रबिंदू मानले जाते. ज्यामुळे महात्मा गांधींना नोबेल पुरस्कार नाकारण्यात आले आहे. आयडिया आफ जस्टीस आणि लाईट आफ एशिया ही पुस्तके समजून घेतली पाहिजेत.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, मानवीय उत्थानासाठी आवश्यक उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना कुठलाही वंश, व्यवसाय, पद, प्रतिष्ठा, लिंग इत्यादी च्या अनुषंगाने भेदभाव न करता हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्याचे १९५४ पासून सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्या वर्षी १९५४ ला सी. राजगोपालाचारी, सर्वपल्ली राधाकृष्णन, व सी. व्ही. रमण यांना भारतरत्न हा पुरस्कार देण्यात आला आहे तर १९९० ला जेव्हा डॉ बाबासाहेब आंबेडकरांना मरणोत्तर भारतरत्न देऊन सन्मान करण्यात आला त्याच वर्षी दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला यांनाही पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले होते आणि यावर्षी कर्पूरी ठाकूर, लालकृष्ण अडवाणी, पी. व्ही. नरसिंहराव, चौधरी चरण सिंह, एम. एस. स्वामीनाथन यांना पुरस्कार देण्यात आला. अशाप्रकारे आतापर्यंत ५३ व्यक्तींना भारतरत्न पुरस्कार देण्यात आला आहे. जर एम. एस. स्वामीनाथन यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे तर मग त्यांनी शेतकऱ्यांच्या विकासासाठी सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी सरकार का करीत नाही? तसेच भारताचे संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या उपाय योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी का केली जात नाही? हे प्रश्न अनुत्तरित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बी. ए., एम. ए., एम. एस्सी., पीएचडी., डीएस्सी, डी. लिट, बार-ॲट-ला, सह विविध विषयांत प्राविण्यपूर्ण अति उच्च शिक्षण प्राप्त करून मानवतावादी कार्य केले. ज्यामुळे त्यांना भारतरत्न प्रदान करण्यात आले ही आपल्यासाठी गौरवास्पद बाब आहे. तसेच जागतिक स्तरावर जयंती साजरी करण्याचे प्रस्ताव पास झाल्याने जगभरात जयंती साजरी होणारे हे महनीय व्यक्तीमत्व असल्याने आपण त्यांना विश्वरत्न संबोधले पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न बहाल केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने १९९६ ला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार सुरू केला ज्याची सुरुवात २००७ ला करण्यात आली आहे. हा पुरस्कार आतापर्यंत एस. एम. कृष्णा, नितीशकुमार, आनंद तेलतुंबडे, जोगिंदर सिंग, कांशीराम, शबाना आझमी, पी. एस. कृष्णन, मायावती, प्रकाश आंबेडकर, ऋचा छड्डा, हर्षाली मल्होत्रा, योगी आदित्यनाथ यांना प्रदान करण्यात आला आहे.

या कार्यशाळेला रूपचंद पवार, कारभारी त्रिभुवन, संतोष गडकर, सुधाकर दांडगे, महादेव डांबरे, अजय रमेश बनसोडे, गोविंद कांबळे, डॉ. संघरत्न गवई, दीक्षा कांबळे, साधू आनंद, अनामी मोरे, एड. विलास रामटेके, डॉ. आर. डी. बडगे, प्रज्वलित बनसोडे, राष्ट्रपाल सोनकांबळे, विराज गोविंद कांबळे, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात इंजीनियरिंग प्रवेश मार्गदर्शन मेळाव्यास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

लातूर :- महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सीईटी सेलच्यावतीने बारावी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग प्रवेश मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून एमआयटी (पुणे) येथील सहयोगी प्राध्यापक आशिष शिवकुमार उटगे, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, सीईटी सेलचे समन्वयक प्रा. नितीन वाणी यांची यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. आशिष उटगे म्हणाले की, इंजिनिअरिंग शाखा ही ज्ञानाचे महत्त्व व मर्यादा सांगणारी आहे. भारत देश हा सर्वच क्षेत्रात नोकरी देणारा एकमेव देश आहे. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्यासोबतच इंजिनिअरिंग शाखा ही व्यवस्थित काम देणारी शाखा आहे. विद्यार्थ्यांनी इंजिनिअरिंग शाखेचा अभ्यास करताना फार मेहनत व अभ्यासामध्ये सातत्य ठेवणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.





यावेळी बोलताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे मणले की, संपूर्ण इंजिनिअरिंग क्षेत्राचा लेखाजोखा विद्यार्थ्यांसमोर मांडला. मरीन इंजीनियरिंग, रोबोट इंजिनिअरिंग, बायो इंजीनियरिंग, मेडिकल इंजिनिअरिंग यासारख्या महत्त्वपूर्ण इंजिनिअरिंग क्षेत्राचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ .संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नेहमी आपल्या आई वडिलांच्या कष्टांचे स्मरण करावे. आई-वडिलांना सतत आपल्या डोळ्यासमोर ठेवूनच अभ्यास करावा. गरिबी ही माणसाला कष्ट करण्याचे महत्त्व सांगून जाते. नव्या पिढीने भ्रमणध्वनी पासून दूर राहावे व आपले ध्येय साध्य होईपर्यंत सातत्याने प्रयत्न, चिकाटी व जिद्द ठेवून अभ्यास करावा असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. नितीन वाणी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. के. आर. सूर्यवंशी यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नरेश वाडकर, अनिल कोळ्ळे, शुभम बिराजदार, भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम घेतले.

## संगमेश्वर तालुक्यातील माखजन राधाकृष्ण मंदिर येथे बाल प्रभू श्रीराम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना निमित्त आमदार शेखर निकम यांची सदिच्छा भेट



माखजन / प्रतिनिधी : संगमेश्वर तालुक्यातील माखजन येथील राधाकृष्ण मंदिर येथे बाल प्रभू श्रीराम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना निमित्ताने आमदार शेखर निकम यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी कार्यक्रमात ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांना श्रीफळ, देत सन्मानित केले. तसेच रत्नागिरी जिल्हा युवक कार्याध्यक्ष सुशील भायजे, माखजन गावचे सरपंच महेश बाष्टे, गणपत चव्हाण,अजिज आलेकर, माजी जि.प.सदस्य दीपक जाधव, आंबव गावचे सरपंच शेखर उकार्डे,नितीन सागवेकर,अभी आंबवकर, संतोष पाडळकर,किशोर तांबट,योगेश, भोजने,मंदार बेलवलकर ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

## स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर करणे आमची संस्कृती शिकवते भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर

लातूर/प्रतिनिधी :- स्त्री शक्तीचा सन्मान आणि आदर करणे आमची संस्कृती शिकवते असे उद्गार श्रीमद भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर यांनी आज लातूर तालुक्यातील हरंगुळ बु परिसरातील कैलास नगर येथे सुरु असलेल्या श्रीमद्भागवत कथा अमृतपान ज्ञानयज्ञ सोहळ्यातील चौथ्या पुष्पाहुतीच्या वेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी श्रीमद्भागवत कथेतील चौथ्या दिवसाच्या अख्यानात राजा परिक्षताच्या कथेतील सारांश सारांश सांगताना राजा परिक्षताच्या पूर्वजांनी म्हणजे स्त्री स्वाभिमान आणि संरक्षणासाठी सर्वस्व पणाला लावून दुष्ट कौरवांचा संहार केला आजही दुष्ट वृत्तींचा आपल्या समाज व्यवस्थेकडून समाज मनाकडून संहार केला गेला पाहिजे. समाजातील प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने उभी असलेली स्त्री आज खरीच सुरक्षित आहे का असा देखील प्रश्न यावेळी उपस्थित केला. ती समाज, गावात, गल्लीत, शहरात अगदी तिच्या शाळा, महाविद्यालय, कार्यालय

### कु. भाग्यश्री सुर्यकांत सुडेला भावपूर्ण श्रध्दांजली

श्रीमद्भागवत कथे दरम्यान लातूर तालुक्यातील हरंगुळ बु येथील माजी सरपंच श्री सूर्यकांत सुडे यांची कन्या भाग्यश्री ही सकल महाराष्ट्राची कन्या होती. तिच्यावर झालेला अन्याय उद्या आपल्यावरही किंवा आपल्या मुलीवरही होऊ शकतो. त्यामुळे अन्याय करणाऱ्या विरुद्ध आवाज उठवण्यासाठी यावेळी कु. भाग्यश्री सुर्यकांत सुडेला सर्व भाविक भक्तांनी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून दुष्ट वृत्तींचा निषेध करत त्यांना तात्काळ फाशी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

अशा ठिकाणी असुरक्षित आहे. म्हणून तिच्या संरक्षणासाठी सरकार आणि व्यवस्थापनांनी लैंगिक शोषण किंवा स्त्री सुरक्षेसाठी कायदे करावे असे आवाहन देखील यावेळी केले. यावेळी भागवताचार्य व्यंकट थडकर महाराज बाभळगावकर यांच्यासह गायनाचार्य शाम मोरे, सिंथवादक महादेव मस्के,




पखवाजवादक कल्याण पवार गुरुजीसह कैलास नगर, गोविंद नगर, सदाशिव नगर सह हरंगुळ बु. परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## नकली शिवसेना म्हणता ती तुमची डिग्री आहे का?

पालघर : विश्वगुरु म्हणता आणि प्रत्येक भाषण उद्धव ठाकरेंचा उद्धार केल्याशिवाय यांचे भाषण पूर्ण होत नाही, नकली शिवसेना म्हणता ती तुमची डिग्री आहे का? अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पीएम मोदींवर घणाघाती प्रहार केला. पालघरमध्ये जाहीर सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी पीएम मोदी आणि अमित शाह यांनी केलेल्या टीकेवर जोरदार प्रहार केला. ते म्हणाले की, हा भाडखाऊ जनता पक्ष आहे, यांना गाडायचं असेल आत्ताच गाडा, देणार साथ त्याचा करणार घात अशी प्रवृत्ती असल्याचे ठाकरे म्हणाले. ठाकरे म्हणाले की, इकडे फणा काढून बसतात आणि तिकडे चीनकडे शेपूट घालून फिरतात. तुम्हाला देशात सरकार पाहिजे ना हो की नाही मग तुम्हाला मोदी सरकार पाहिजे की भाजप सरकार पाहिजे पण ते तर जाहिरात करतात. भारत माता माझी माता आहे मोदीजी तुमचे नाव तुमच्या दाराच्या पाठीवर लावा माझ्या देशाच्या पाठीवरती तुम्हाला लावता येणार नाही, तर गोव्याच्या बाहेर लावा नाहीतर गुजरातीत परत गेल्यानंतर तुमच्या दाराच्या बाहेर नाव लावा पण माझ्या देशाच्या सरकारवरती मोदी नाव पुन्हा लावता कामा नये, येता कामा नये. एक माणूस सगळ्यांना गुलाम बनू शकतो? अशी विचारणा त्यांनी केली.

## भाजपा युवा नेते ऋषिकेश कराड यांच्याकडून ठिकठिकाणी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा

लातूर :- मुस्लिम बांधवांचा रमजान ईद हा पवित्र सण या निमित्ताने ईदच्या दिवशी भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी रेणापूर तालुक्यातील रेणापूर, पानगाव, इंदरठाणा येथील मुस्लिम बांधवांना भेटून ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी युवा नेते कराड यांच्या समवेत भाजपाचे तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, भाजयुमोचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण आणि संघटक दिलीप पाटील हे होते.

भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी रमजान ईद निमित्ताने गुरुवारी रेणापूर पानगाव आणि इंदरठाणा येथील गावात जाऊन मुस्लिम बांधवांची भेट घेऊन सर्वांना सुख, समृद्धी, समाधान लाभावे आणि आयुष्यात चांगले दिवस यावेत अशा ईद निमित्ताने शुभेच्छा दिल्या. ठिकठिकाणी शूरखुंब्याचा उपस्थितानी आनंद घेतला. विविध विषयावर चर्चा झाली मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. तिन्ही गावात मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रेणापूर येथे राजू अत्तार यांच्या निवासस्थानी भेट दिली असता युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांचा परिवाराच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, शेख अजीम, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, संतोष राठोड, सुरज फुलारी, सचिन शिरसकर, विकी राजे, मकसूद शेख, हुसेन पठाण, सोहेल बागवान, जयेद आत्तार, साजीद, तांबोळी गौस, शेख, इरफान शहा, अफजल सय्यद, सरवर आतार, समीर शेख, अजीम शेख, जावेद कुरेशी, वाजीद कुरेशी, रफीक कुरेशी, अजीम कुरेशी, साजीद कुरेशी, फारुक कुरेशी, सलमान कुरेशी, शाहनवाज कुरेशी यांच्यासह अनेक जण होते.

पानगाव येथे खदीर आत्तार यांच्या घरी ऋषिकेशदादा कराड यांनी



भेट दिली तेव्हा भाजपाचे गणेश तुरुप, सुकेश भंडारे, जयराम जाधव, शीलताई आचार्य, सोमनाथ माने, विशाल चव्हाण, गणेश माने, नवनाथ पांचाळ, रफिक पठाण, शफिक पठाण, हाफिज शेख, इस्माईल शेख, जाफर शेख, इस्माईल मणियार, ईलाही शेख, आयुब मणियार, इनुस शेख, सरफरोश आत्तार, जलील शेख यांच्यासह अनेक जण होते.

मौजे इंदरठाणा येथील उपसरपंच इब्राहिम सय्यद यांच्या घरी ऋषिकेश दादा कराड यांनी भेट दिली अनेकांशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या याप्रसंगी सरपंच अविनाश रणदिवे, अन्वर सय्यद, वाजिद पटेल, हाशम सय्यद, नयूम सय्यद, विजय घोडके, निजाम सय्यद यांच्यासह अनेक जण होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE